पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,४११ ०१८.
'क' क्षेत्रिय कार्यालय, भोसरी-२६.
जा. क्र./प्रशा/१/कावि/९८७ /२०२१.
दि. ०५/०३/२०२१.

विषय - कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश.

संदर्भ - १) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५.
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. वैद्य/९/कावि/२९४०/२०२०, दि. १३/०६/२०२०.
५) मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. वैद्य/९/कावि/२९९७/२०२०, दि. १८/०६/२०२०.
६) मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्र.वैद्य/९/कावि/४१४६/२०२०, दि. ३१/०७/२०२०.
७) कोविड-१९ अंतर्गत दि. २२/०२/२०२१ रोजी आयोजीत सभेमधिल सुचना.
८) मा. अतिरीक्त आयुक्त(२) यांचेकडील आदेश क्र. वैद्य/०९/कावि/७२०/२०२१, दि. २४/०२/२०२१.

आदेश,

ज्याअर्थी कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या Covid 19 या संसर्गजन्य आजारामुळे पिंपरी चिंचवड शहरात आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटना तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव प्रस्तावित केलेल्या विविध उपाय योजनांची अंमलबजावणी या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागू करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील कोरोना विषाणू बाधित रुग्णांची संख्या विचारात घेता, येत्या काळात पिंपरी चिंचवड शहरात रुणांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील नागरीकांचे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील काही भागांमध्ये पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर, बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक झाले आहे.

ज्याअर्थी, अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४००००१ दि.१४ मार्च २०२० क्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ "महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम,२०२०" नुसार एखादया भौगोलिक क्षेत्र उदाहरणार्थ गाव, तालुका, वॉर्ड कॉलनी इत्यादी मध्ये कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव/उद्रेक आढळल्यास अशा उद्रेकजन्य क्षेत्राबाबत खाली नमूद केलेल्या तसेच प्रसंगानुसार आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त सक्षम प्राधिकारी असतील अशा भौगलिक क्षेत्रांच्या बाबतीत क्र.१० मधील

१. क्षेत्र प्रतिबंधित करणे.
२. क्षेत्राआतील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे.
३. क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे.

तसेच भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ प्रमाणे संभाव्य होणाऱ्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे. याकरीता कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सबब साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ (एपिडमिक ऍक्ट) मधील तरतुदींनुसार, पिंपरी चिंचवड शहरातील "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दि.०५/०३/२०२१ रोजी आढळून आलेल्या कोविड-१९

बाधीत रुग्णांचा राहत असलेला खालील नमुद परिसर राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानूसार सुक्ष्म कंटेन्मेंट झोन (मायक्रो) तयार करुन सदर परिसर सील करणे आवश्यक आहे.

कोविड ,१९ चा वेगाने होणारा प्रसार रोखण्यासाठी व संभाव्य सामुदायीक प्रसार (Community Transfer) टाळण्यासाठी शहरातील नागरिकांच्या हालचालीवर, बाहेर फिरण्यावर मर्यादा आणण्याकरीता **संदर्भिय आदेशान्वये प्रदान** केलेल्या आधिकारानूसार पुढील नमुद परिसर हा Microw Containment Zone म्हणून सील करणेत येत आहे.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | समाविष्ट भाग | रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 6 | हनुमान नगर, भगतवस्ती, भोसरी | 2 |
| 2 | 8 | शुभयोग निर्मिती सोसायटी, फ्लॅट नं. 1208, देहू आळंदी रोड, मोशी | 2 |
| 3 | 8 | बी/407, इला हौ. सो. पुणे नाशिक रोड, मोशी | 4 |
| 4 | 8 | वुड्स व्हिले. सो. फेज सी/1, फ्लॅट नं. 202, बो-हाडेवाडी, मोशी. | 3 |
| 5 | 8 | सुर्यदर्शन अपार्टमेंट, पाटील नर्सिंग होन शेजारीफ्लॅट नं. 308, इंद्रायणी नगर, भोसरी | 2 |
| 6 | 9 | ए विंग फ्लॅट नं. 304, सोना रुपा बिल्डींग, खराळवाडी | 3 |
| 7 | 9 | श्री. साई अपार्टमेंट, फ्लॅट नं. 502, मंजूळा पार्क, नवनहाराष्ट्र शाळेजवळ, मासूळकर कॉलनी पिंपरी | 2 |
| 8 | 9 | विजयपार्क, स. न. 165/19, फ्लॅट नं. 2, श्री अपार्टमेंट, कामगार नगर, पिंपरी | 3 |

वरीलप्रमाणे कार्यक्षेत्रामध्ये –

१. वैद्यकीय विभागामार्फत सर्व कर्मचारी यांनी उपरोक्त नमूद सूक्ष्म कंटेनमेंट झोनमध्ये राज्य शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार ILI/SARI/६०वर्षाच्या वरील/ असंसर्गजन्य व दुर्धर आजारांनी ग्रस्त व्यक्तींचे सर्वेक्षण दररोज करावे, त्यासंबंधित आवश्यक ते संपुर्ण कामकाज करावे.

२. आरोग्य विभागामार्फत निर्जंतुकीकरण फवारणी करावी.

३. स्थापत्य विभागामार्फत आढळून आलेल्या रुग्णांच्या घर/ इमारतींच्या दर्शनीभागावर "कोरोना कोविड - १९ प्रतिबंधीत क्षेत्र" फ्लेक्स बोर्ड लावावेत.

हा आदेश आज दिनांक ०५ मार्च २०२१ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

क्षेत्रिय अधिकारी
"क" क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत - माहितीस्तव सादर ,

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. मा. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय पिं.चिं, यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित
३. मा. जेष्ठ वैद्यकीय अधिकारी,
४. मध्यवर्ती नियंत्रण कक्ष (War Room) पिं. चिं. मनपा.
५. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, भोसरी/पिंपरी/भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन